|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. ८ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या नंदुरबार येथील आदिवासी अकादमीत उद्या दि.९ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी दिनानिमित्त एम.एस.डब्ल्यू. या अभ्यासक्रमाला प्रारंभ होत आहे.

ग्रामीण व आदिवासी विद्यार्थ्यांकरीता शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून एम.एस.डब्ल्यू. हा पदव्युत्तर अभ्यासक्रम आदिवासी अकादमी नंदुरबार येथे सुरु होत आहे. या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रीया पूर्ण झाली असून उद्या शुक्रवारी या अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांच्या स्वागताचा कार्यक्रम दुपारी २ वाजता आयोजित करण्यात आला आहे. उद्या जागतिक आदिवासी दिवस असून या समारंभासाठी कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य महेंद्र रघुवंशी हे उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती अकादमीचे प्रभारी संचालक प्रा.के.एफ.पवार यांनी दिली.

### बातमी क्र.२

जळगाव, दि. ८ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्यावतीने दिले जाणारे विद्यापीठस्तरीय राष्ट्रीय सेवा योजना कार्यगौरव पुरस्कार जाहीर झाले आहेत.

रासेयो एकक उत्कृष्ट कार्यगौरव पुरस्कार जळगाव जिल्ह्यातून बोदवड येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाला जाहीर झाला आहे. धुळे जिल्ह्यासाठी दोंडाईचा येथील स्वोध्दारक विद्यार्थी संस्थेचे दादासाहेब रावल कला व विज्ञान महाविद्यालय आणि नंदुरबार जिल्ह्यासाठी बामखेडा ता. शहादा येथील ग्रामविकास संस्थेचे कला महाविद्यालयाला जाहीर झाला आहे. उत्कृष्ट कार्यक्रम अधिकाऱ्यांमध्ये जळगाव जिल्ह्यात डॉ.अनिल बारी(कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बोदवड), धुळे जिल्हा- डॉ.कैलास चौधरी (दादासाहेब रावल कला व विज्ञान महाविद्यालय, दोंडाईचा) नंदुरबार जिल्हा- डॉ.छबीलदास करंके (ग्रामविकास संस्थेचे कला महाविद्यालय, बामखेडा) रासेयो उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून जळगाव जिल्ह्यासाठी जयेश साळुंके (समाजकार्य विभाग, सामाजिकशास्त्रे प्रशाळा, कबचौउमवि), धुळे – वृंदावना पाटील (डॉ. पी.आर. घोगरे विज्ञान महाविद्यालय, धुळे), नंदुरबार – राम ठाकरे (जीटीपी महाविद्यालय, नंदुरबार). संबंधितांना विद्यापीठातर्फे आयोजित कार्यक्रमात पुरस्कार दिले जाणार असल्याची माहिती रासेयो संचालक डॉ.सचिन नांद्रे यांनी दिली.

### बातमी क्र.३

जळगाव, दि. ८ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळेच्यावतीने सायबर जागरुकता दिनानिमित्त सायबर सुरक्षा या विषयावर बुधवार दि.७ ऑगस्ट रोजी एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली.

प्रशाळेतील क्विक हिल सायबर वॉरीयर क्लब आणि क्विक हिल फौंडेशन यांच्यावतीने झालेल्या या कार्यशाळेत ॲड श्रध्दा काबरा, ॲड गायत्री विसपुते, ॲड भक्ती उपासनी, प्रशाळेचे संचालक प्रा.सतीश कोल्हे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा घेण्यात आली. या कार्यशाळेत ७०० विद्यार्थी सहभागी झाले होते. सायबर स्वयंसेवक पायस सावळे, मयुर बांडे, प्रियंका मराठे, प्रणित मराठे यांनी सायबर गुन्हे कसे घडतात याची माहिती दिली. यावेळी समन्वयक प्रा.राजू आमले, प्रा.अजय सुरवाडे, प्रा.राम भावसार, प्रा.सुरेंद्र कापसे, प्रा. मनीषा देशमुख आदी उपस्थित होते.

### बातमी क्र.४

जळगाव, दि. ८ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या माध्यमशास्त्र प्रशाळेतील एम.ए.एम.सी.जे. २०२२-२३ बॅचचा विद्यार्थी गौरव हरताळे यांनी जनसंवाद आणि पत्रकारिता विषयात सेट परीक्षेत यश संपादन केले आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे यांच्यावतीने ७ एप्रिल रोजी घेण्यात आलेल्या सेट परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असुन जनसंवाद आणि पत्रकारिता विषयात गौरव हरताळे हे उत्तीर्ण झाले आहे. गौरवला माध्यमशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.डॉ.सुधीर भटकर, डॉ.गोपी सोरडे,डॉ.सोमनाथ वडनेरे यांचे मार्गदर्शन लाभले.

---

प्रती,
मा.संपादक/प्रतिनिधी,
कृपया,उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी,ही विनंती.

आपला विश्वासू

( डॉ. सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी